# <u>मृत्युपत्र</u>

मृत्युपत्र आज रोजी ___ वार दिनांक ___ माहे ____ २०___ ई.स.वि. ते दिवशी.

| | |
|---|---|
| **संपूर्ण नाव**<br>**वय:**____ वर्षे **व्यवसाय:** सेवानिवृत्त<br>**राहणार:** संपूर्ण पत्ता.<br>**PAN:**<br>**AADHAR:** | मृत्युपत्र करणार |

मृत्युपत्र स्थावर आणि जंगम मालमत्तेचे

<u>कारणे मृत्युपत्र लिहून ठेवतो कि,</u>

1) मी वरील पत्त्यावर कायमस्वरूपी राहण्यास असून, ___________ संस्थेमधून माहे _____ २०__ मध्ये सेवानिवृत्त झालो आहे. आज रोजी माझे वय ___ असून देखील माझी प्रकृती उत्तम आहे. मी स्वतः चालत-फिरत असून, माझी बुद्धी चांगली आहे. माझी स्वतःची सर्व कामे मी स्वतःच करीत असतो. काय चूक काय बरोबर हे मला कळत असून, योग्य तो निर्णय घेण्याची क्षमता माझ्यात आहे व त्याप्रमाणे डॉक्टरांचे प्रमाणपत्र देखील आज रोजी माझेकडे आहे. परंतु, निसर्ग-नियमानुसार मानवी देहाचे कधी काय होईल याचा भरवसा नसल्याने मी प्रस्तुतचे मृत्युपत्र लिहून ठेवत आहे. याआधी आज-पर्यंत मी कोणतेही मृत्युपत्र केलेले नाही, व यदा-कदाचित काही तोंडी अथवा लेखी केले असेल, तर प्रस्तुतच्या मृत्युपत्राद्वारे मी आधीची सर्व मृत्युपत्र रद्द करीत आहे.

2) माझ्या पश्चात माझ्या मागे, माझी पत्नी _________ (वय:___ रा. ____), मुलगा __________ (वय:___ रा. ____), व मुलगी __________ (वय:___ रा. ____) एवढेच वारस आहेत. यांव्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत.

3) आज रोजी माझ्या स्वतःच्या मालकीच्या आणि माझ्या ताब्यात असलेल्या पुढीलप्रमाणे मालमत्ता आहेत:

   i) राहते घर: (सूची क्र. २ प्रमाणे संपूर्ण वर्णन)
   ii) एन. ए. प्लॉट: (सूची क्र. २ प्रमाणे संपूर्ण वर्णन)
   iii) _____ बँकेच्या ______ शाखेतील बचत खाते क्र. ____
   iv) __ बँकेच्या __ शाखेतील __ रकमेची मुदत ठेव क्र. __
   v) ______ कंपनीचे ____ समभाग
   vi) ____ तोळे वजनाची सोन्याची वेढणी

4) या सर्व मालमत्ता मी स्वकष्टार्जित घेतलेल्या असून, वडिलोपार्जित नाहीत, तसेच त्यावर माझ्याव्यतिरिक्त इतर कोणाचाही कसलाही हक्क नाही. आज रोजी माझेवर कोणतेही कर्ज नाही तसेच मी कोणाचे काहीही देणे लागत नाही.

   i) वरीलपैकी मालमत्ता क्र. १, राहते घर, याची मालकी माझ्यानंतर माझी पत्नी _______ हिची होईल आणि तिच्या मृत्युपश्चात माझा मुलगा ______ याचे मालकीची होईल. परंतु, माझा मुलगा व मुलगी यांना त्यांची इच्छा असेपर्यंत कायमच त्यामध्ये राहण्याचा हक्क असेल.

   ii) मालमत्ता क्र. २, प्लॉटची संपूर्ण मालकी माझ्यानंतर माझा मुलगा ______ याची असेल.

   iii) माझ्या पत्नीला उत्पन्नाचे इतर काहीही साधन नसल्यामुळे, वरीलपैकी मालमत्ता क्र. ३, बँक खाते, मधील एकूण रकमेपैकी रु. ५,००,०००/- (पाच लाख फक्त) तिला मिळतील, व उर्वरित रक्कम माझा मुलगा व मुलगी यांनी सम-सम प्रमाणात वाटून घ्यावी.

   iv) मालमत्ता क्र. ४ आणि ५, या गुंतवणुका, माझ्यानंतर माझी पत्नी ______ हिच्या नावे होतील. या गुंतावणुकांमधून मिळणाऱ्या परताव्या मधून तिने तिचा

उदरनिर्वाह, वैद्यकीय खर्च व इतर खर्च चालवावा. तिच्या मृत्युपश्चात माझे मुलगा व मुलगी यांनी या मालमत्ता सम-सम प्रमाणात वाटून घ्याव्यात.

v) मालमत्ता क्र. ६, हे सोन्याचे जिन्नस आहेत व त्यावर परंपरेनुसार स्त्रियांचा हक्क असावा अशी माझी धारणा असल्याने, माझ्या पश्चात सर्व सोन्याची वेढणी माझी मुलगी _____ हिला मिळतील.

vi) वरील मालमत्तेव्यतिरिक्त माझ्या मृत्यूचे वेळी माझ्याकडे असणारी, किंवा मला मिळणार असणारी इतर सर्व मालमत्ता, पैसे ई. माझा मुलगा ____ याला देण्यात यावी.

5) यदाकदाचित जर माझ्या आधी माझ्या पत्नीचा मृत्यू झाला, तर तिच्या नावे होणार असणारी सर्व मालमत्ता माझा मुलगा व मुलगी यांनी सम-सम प्रमाणात वाटून घ्यायची आहे.

6) सदर मृत्युपत्राचा विषय असलेल्या सगळ्या मालमत्ता, जोपर्यंत मी हयात आहे, तो पर्यंत माझ्याच मालकीच्या असणार आहेत व त्या माझ्या इच्छेप्रमाणे वापरण्याचा किंवा खर्च करण्याचा, किंवा त्यांची मनाला वाटेल तशी विल्हेवाट लावण्याचा संपूर्ण हक्क मलाच असणार आहे. माझ्या मृत्युच्या वेळी शिल्लक असणाऱ्याच मालमत्तांची विभागणी होणार आहे.

7) सदर मृत्युपत्राप्रमाणे माझ्या मालमत्तांची विभागणी व्हावी, तसेच मृत्युपत्रानुसारच संपूर्ण कार्यवाही व्हावी, म्हणून मी माझे परिचयाचे व उत्तम स्नेही ______ यांची कार्यवाहक म्हणून नियुक्ती करण्याची माझी इच्छा आहे. त्यांचेजवळ मी ही इच्छा बोलून दाखवली असता, कार्यवाहक म्हणून काम करण्याचे त्यांनी मान्य केले आहे. त्यामुळे, या मृत्युपत्राद्वारे मी _______ यांची कार्यवाहक म्हणून नियुक्ती करत आहे.

8) तरी, आज रोजी, मी माझ्या इच्छेप्रमाणे, कोणाच्याही दबावाखाली न येता, नशा-पाणी न करता, संपूर्ण शुद्धीत असताना, आणि डॉक्टरांच तस प्रमाणपत्र घेऊन सदरच मृत्युपत्र करून ठेवत आहे. यात लिहिल्याप्रमाणे, सगळ्या वारसांनी हीच माझी अंतिम इच्छा समजून, मतभेद न करता संपत्ती वाटून घ्यायची आहे.

| **मृत्युपत्र लिहून ठेवणार** | **सही** | **फोटो** | **अंगठा** |
|---|---|---|---|
| | | | |

**साक्षीदार १.**

सही:

नाव:

पत्ता:

**साक्षीदार २.**

सही:

नाव:

पत्ता: